


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २२० ●रविवार,दि.०९ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

## मनोज जरांगे नार्को टेस्टसाठी तयार, धनंजय मुंडे यांना खुलं आव्हान

**जालना । प्रतिनिधी**

माजी मंत्री धनंजय मुंडे यानी दिलेले आव्हान मनोज जरांगे यांनी स्वीकारलं आहे. जरांगे यांना मारण्याची सुपारी दिली की नाही या प्रकरणी आरोपी, आपली आणि जरांगे यांची नार्को टेस्ट करा अशी मागणी धनंजय मुंडे यांनी केली. त्यावर मनोज जरांगे यांनी आपल्या शिष्टमंडळाच्या माध्यमातून जालना पोलीस अधीक्षकांची भेट घेतली आणि आपण नार्को टेस्टसाठी तयार असल्याचं सांगितलं. या प्रकरणातील सर्वांची नार्को टेस्ट आजच करा अशी मागणी त्यांच्या शिष्टमंडळाने केली आहे.

अंतरवाली सराटीचे सरपंच पांडुरंग तारक यांच्यासह मनोज जरांगे यांच्या सहकाऱ्यांनी जालना पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले. मनोज जरांगे हे नार्को टेस्टसाठी तयार असून या प्रकरणातील सर्वांचीच नार्को टेस्ट करा अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. जरांगेंना मारण्यासाठी अडीच कोटींची सुपारी मनोज जरांगे पाटलांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत.



जरांगे पाटलांनी पत्रकार परिषद घेत आपल्या हत्येची सुपारी धनंजय मुंडेंनी दिली असा खळबळजनक आरोप केला होता. त्यानंतर धनंजय मुंडेंनीही याला उत्तर देत हे आरोप फेटाळले होते. त्यावर पुन्हा मनोज जरांगे पाटलांनी भाष्य केले. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे आणि आरोपीची ऑडिओ क्लिप ऐकवली.

**● मनोज जरांगेंच्या या आरोपांनंतर धनंजय मुंडेंनीही पत्रकार परिषद घेत सर्व आरोप फेटाळले. तसंच या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी करा, अशी मागणी धनंजय मुंडेंनी मुख्यमंत्री फडणवीसांकडे केली. यासोबतच आरोपींसह आपली आणि मनोज जरांगेंची नार्को टेस्ट करण्याची मागणीही धनंजय मुंडेंनी केली.**

मनोज जरांगे पाटलांनी सुरुवातीला अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींची ऑडिओ क्लिप ऐकवली. नंतर त्यांनी धनंजय मुंडे आणि आणखी एका आरोपीची ऑडिओ क्लिप ऐकवली. दरम्यान आपण सीबीआय चौकशीसाठी तयार असल्याचं जरांगेंनी म्हटलं होतं. तसंच नार्को टेस्टसाठी पहिला अर्ज करणार असल्याचा दावाही त्यांनी केला होता. त्यानुसार आता त्यांनी तसा अर्जही केला आहे.


मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटलांना यांना जीवे मारण्याचा कट रचल्याप्रकरणी, गोंदी पोलिसांनी गेवराईतून अमोल खुणे आणि विवेक उर्फ दादा गरुड या दोघांना अटक केली. कोर्टाने या दोन्ही आरोपींना ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या दोन आरोपींपैकी अमोल खुणे हा मनोज जरांगेचा समर्थक असल्याचं सांगितलं जातं आहे. खुणे कुटुंबीयांनी जरांगेंनी केलेले आरोप फेटाळत, दारुच्या नशेत त्याच्या तोंडून हे बोलून घेतल्याचा दावा केला. मनोज जरांगेंचं स्टेटस ठेवणाऱ्या माझ्या पतीला अडकवलं जात असल्याचाही आरोप अमोल खुणेच्या पत्नीने केला. भाजप आमदार सुरेश धस यांनी यांनी मनोज जरांगे यांची अंतरवाली सराटीमध्ये भेट घेतली. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यात झालेल्या भेटीवर जरांगेंनी जोरदार टीका केली होती. या टीकेनंतर धस पहिल्यांदाच जरांगेंच्या भेटीसाठी दाखल झाले. मनोज जरांगेंनी धनंजय मुंडेंवर हत्येचा कट रचल्याचे आरोप केले. त्यानंतर काही वेळातच धस जरांगेंच्या भेटीसाठी दाखल झाले. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली..

## बनावट सोने गहाण ठेवून बँक ऑफ बडोदाची सव्वाकोटी रुपयांची फसवणूक

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बँक ऑफ बडोदाच्या दोन शाखांमध्ये बनावट सोने गहाण ठेऊन तब्बल १ कोटी ३६ लाख २५ हजार रुपयांचे कर्ज उचलणाऱ्या टोळीचा भांडाफोड झाला आहे. या प्रकरणी १५ खातेदार आणि ३ सराफ व्यावसायिकांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, मुख्य आरोपी सराफ विलास उदावंत याला बीड शहर पोलीसांनी पुण्यातून अटक केली आहे.

बँकेकडून सोन्याच्या तारणावर कर्ज देण्यात येते. यासाठी सोने खरे आहे की खोटे, याची पडताळणी करण्यासाठी बँकेने विलास उदावंत, प्रविण शेडुते आणि किशोर भरडे या तिघा सराफांची नेमणूक केली होती. या तिघांनी मिळून बँकेची फसवणूक केली. पहिल्या तपासणीत विलास आणि प्रविण यांनी सोने तपासले,




तर दुसऱ्या खात्रीसाठी किशोर भरडे याने प्रमाणपत्र दिले. दोनदा तपासणी करून सोने खरे असल्याचे सांगण्यात आले आणि बँकेने कर्ज मंजूर केले. मात्र, नंतरच्या तपासणीत संपूर्ण सोने बनावट असल्याचे उघड झाले ! बँकेला संशय आल्यानंतर अहिल्यानगर येथील नामांकित सराफाकडून पुन्हा एकदा सोन्याची तपासणी करण्यात आली. त्यात १५ खातेदारांचे सोने पूर्णपणे बनावट असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर बँकेने तातडीने पोलिसांत धाव घेतली. मुख्य

▶▶ उर्वरित पान २ वर

## मोबाईल नोट मध्ये नाव टाईप करून आत्महत्या

### मोबाईल मध्ये SDPO वाघमारे,CO अंधारे,कदम,तिडके व काळेचे नाव.


**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद कर्मचारी धांडे यांनी बीड नगरपालिकेतील टेरेसवर असलेल्या लोखंडी सीडीला गळफास घेतल्याने एकच खळबळ उडाली.

धांडे यांच्या आत्महत्या प्रकरणी अनेकांची नावे जोडले जात असून, मयताने आत्महत्या पूर्वी डीपीओ संभाजी वाघमारे, पूर्वीच्या सीओ निता अंधारे, सम्राट कदम, विश्वांभर तिडके यांच्यावर आरोप कले आहे. हा मजकूर मयत धांडे यांच्या मोबाईल मध्ये नोट पॅड मध्ये आहे. यामुळे मोठी खळबळ उडाली असून, पोलिसांच्या तपासातच याबाबत खुलासा होईल. अविनाश धांडे असे आत्महत्या केलेल्या कर्मचाऱ्याचे नाव असून, ते नगरपरिषदेत वसुली विभागात कार्यरत होते. शुक्रवारी (दि.७) रात्री १२ वाजण्याच्या सुमारास नगरपरिषद इमारतीच्या छतावर लोखंडी शिडीला



गळफास घेतलेल्या अवस्थेत अविनाश धांडे यांचा मृतदेह आढळला होता. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करुन मृतदेह जिल्हा रुग्णालयात हलविला होता. सकाळी याप्रकरणी मयताचा मोबाईल तपासला असता त्यात नोट पॅड मध्ये धक्कादायक मजकूर आढळला आहे. यात त्यांनी डीपीओ संभाजी वाघमारे यांनी अनुभव नसणाऱ्या प्रमोशन दिले असून, जे प्रमोशनच्या लायक आहेत त्यांना डावलण्यात आले. तत्कालीन सीओ निता अंधारे यांनी सीआर वर मार्क कमी दिले आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर



**मोबाईल नोट पड मधील मजकूर :**

१)अनुभव नसतांना डीपीओ संभाजी वाघमारेंनी प्रमोशन दिले; २)निता अंधारेंनी सिआर वर मार्क कमी दिले. ३)सम्राट कदम, विश्वंभर तीडके, चंद्रकांत काळे यांना कंटाळल्याचा मजकूर.

**● बीड नगरपरिषदेत खळबळ**

**मृत अविनाश धांडे हे नगरपरिषदेच्या वसुली विभागात गेल्या काही वर्षांपासून कार्यरत होते. पोलिसांनी सुरु केला आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमॉर्टेमसाठी रुग्णालयात पाठवण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. या घटनेमुळे नगरपरिषदेतील कर्मचारी वर्गात शोककळा पसरली आहे. अविनाश धांडे यांच्या अचानक मृत्यूने त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.**

## '२५ कोटींची ऑफर मी नाकारली, म्हणून...'

### गंगाधर काळकुटेंचं धनंजय मुंडेंच्या आरोपांना प्रत्युत्तर; बीडमध्ये वातावरण तापलं

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी लढा देणाऱ्या मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केलेला आहे. धनंजय मुंडे यांनी माझी अडीच कोटींना सुपारी दिल्याचा खळबळजनक दावा जरांगे यांनी केलाय. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी पत्रकार परिषद घेत त्यांना प्रत्युत्तर दिलं. 'आता ज्या कोणाला अटक झाली असेल ते गेस्ट हाऊसवर येऊन भेटले असतील. अटक झालेले कार्यकर्ते त्यांचेच, कबुली देणारे कार्यकर्ते त्यांचेच आणि आरोप माझ्यावर करतायत', असं मुंडे यांनी उत्तर दिलं. त्याचदरम्यान, मनोज जरांगेंचे निकटवर्तीय गंगाधर काळकुटे यांच्यावर देखील मुंडेंनी



आरोप केले होते. आता त्या आरोपांवर गंगाधर काळकुटे यांनी देखील उत्तर दिलं आहे.

धनंजय मुंडेंनी माझ्यावर संभ्रम निर्माण करणारे वक्तव्य केले आहेत. माझ्यामध्ये आणि मराठा समाजामध्ये, माझ्यामध्ये आणि जरांगे पाटलांमध्ये दरी निर्माण व्हावी म्हणून हे वक्तव्य त्यांनी केलं आहे. संतोष आण्णांचा खून झाला तेव्हाच तुमची आणि माझी मैत्री संपली. संतोष भैय्यानंतर माझा नंबर आकाने लावला होता. त्याचे रेकॉर्डिंग आणि पुरावे माझ्याकडे आहेत. लोकसभा निवडणुकीत मी फॉर्म भरला, पण मनोज दादांनी सांगितलं म्हणून मी माघार घेतली. मला विधानपरिषदेचं तुम्ही आमिष दाखवलं होतंस. त्याला मी लाथ मारली', असं काळकुटे यांनी म्हटलं आहे.

लोकसभेवेळी तुम्ही माझ्या भावाकडे काय निरोप दिला होता, त्याची रेकॉर्डिंग मी ऐकवणार आहे. २५ कोटींची ऑफर मी नाकारली. तुमचे माणसं इथे काय काय घेऊन आले नंतर आम्ही त्याला परत पाठवलं. तुमचा राग आहे म्हणूनच मला डुकरासारखं ओढून नेतो असं म्हणाले होते. मराठा-ओबीसी आरक्षण प्रकरण टोकाला होतं म्हणून, आम्ही माघार घेतली. ओबीसी सभेत सुतळी बॉम्ब टाकून मला अडकवायचं तुम्ही ठरवलं होतं. ▶▶ उर्वरित पान २ वर

## इंदुरीकर महाराजांचं मन आभाळाएवढं, मुलीच्या साखरपुड्यावर उधळपट्टी म्हणून टीका, पण सत्य समोरच येताच होतंय कौतुक

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

समाज प्रभोधनकार आणि प्रसिद्ध किर्तनकार निवृत्ती महाराज देशमुख यांच्या मुलीचा नुकताच साखरपुडा पार पडला, संगमनेरमध्ये मोठ्या थाटामाटात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. मात्र इंदुरीकर महाराज हे आपल्या



प्रत्येक किर्तनामध्ये सांगतात की लग्नासारख्या कार्यक्रमामध्ये फार खर्च करू नका, कर्जबाजारी होऊ नका, मात्र त्यांनी आपल्या मुलीच्या लग्नात प्रचंड खर्च केल्यानं सध्या त्यांच्यावर टीका होत आहे. मात्र आपण मुलीच्या साखरपुड्यावर एवढा खर्च का केला? याचं उत्तर देखील त्यांनी दिलं आहे. इंदुरीकर

▶▶ उर्वरित पान २ वर

## झोपडीतून सुवर्णकुस्तीपटू बनलेला सनी फुलमाळी

### ▸ बहरैनमध्ये आशियाई युवा स्पर्धेत ६० किलो गटात सुवर्णपदक
### ▸ आष्टी तालुक्याची मान उंचावल्याने आ. सुरेश धस यांच्याकडून अभिनंदन व कौतुक

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील पाटसरा येथील सनी फुलमाळीने बहरैनमध्ये झालेल्या आशियाई युवा कुस्ती स्पर्धेत ६० किलो गटात सुवर्णपदक पटकावत भारताचा झेंडा अभिमानाने फडकावला आहे. झोपडीत वाढलेला आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करत सनीने मिळवलेलं हे यश सर्वांसाठी प्रेरणादायी ठरलं असून बहरैनमध्ये आशियाई युवा स्पर्धेत ६० किलो



गटात सुवर्णपदक पटकावत मोठे यश संपादन केले आहे.यशाबद्दल आष्टीमतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी अभिनंदन करत सनीचे कौतुक केले आहे. सनीचा परिवार गेल्या १५ वर्षांपासून लोहगाव परिसरात वास्तव्यास आहे. वडील सुभाष फुलमाळी नंदीबैल

▶▶ उर्वरित पान २ वर

**● अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभं राहून आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवणं ही मोठी कामगिरी आहे. सनी फुलमाळीने आपल्या मेहनती, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आष्टीचं नाव उज्ज्वल केलं आहे. अशा तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देणं ही आपली जबाबदारी आहे. सनीचं हे यश ग्रामीण भागातील असंख्य तरुणांना प्रेरणा देणारं आहे. लवकरच त्याचा गौरव करून सन्मान केला जाणार आहे. – आ. सुरेश धस, आष्टी मतदारसंघ**

## दिवसा होणार अंधार, ६ मिनिट २२ सेकंद जग अंधारात, सर्वात मोठं सूर्यग्रहण, तब्बल १०० वर्षाने

**वृत्तसंस्था**

ग्रहणाच्या कालावधीत अनेक बदल होत असतात. खगोलीय दृष्टा ग्रहणाचा कालावधी खूप जास्त महत्वाचा ठरतो. विविध संशोधन यादरम्यान केली जातात. सर्वात जास्त सूर्यग्रहणाला महत्व आहे. दिवसा पृथ्वीमध्ये आपल्याला मोठे बदल होताना दिसतात. सूर्यमालेतील ग्रहण ही खगोलीय घटना आहे, ग्रहणाचा प्रभाव दीर्घकाळ टिकतो. १०० वर्षातील सर्वात



मोठे सूर्यग्रहण लवकरच दिसणार आहे. विशेष म्हणजे यादरम्यान दिवसा काही वेळ अंधार राहिल. या ग्रहणासाठी शास्त्रज्ञांकडून तयारी केली जात आहे. ही शतकातून एकदाच येणारी घटना म्हणून याचे वर्णन केले जातंय. चक्क दिवसा ग्रहणाच्या कालावधीच अंधार बघायला मिळेल. यादरम्यान सूर्याच्या आसपास अनेक बदल आपल्याला बघायला मिळतील. ▶ उर्वरित पान २ वर

## आंतरराष्ट्रीय बाजारात कोट्यावधीची किंमत असणारी व्हेल माशाची उलटी बीडमध्ये जप्त

### सव्वा किलो उलटी किंमत आहे सव्वा कोटी ; बीड मध्ये पहिल्यांदाच अशी कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्यापेक्षाही जास्त किंमत असलेल्या व्हेल माशाची उलटी ची तस्करी करणाऱ्या दोन जणांना उलटी सह ताब्यात घेण्यात पोलिसांना यश मिळाले. या कारवाईत सव्वा कोटी ची उलटी जप्त करण्यात आली. ही बीड जिल्ह्यातील पहिलीच कारवाई आहे. व्हेल माशाची उलटी ची तस्करी होणार असल्याची माहिती सपोनी बाळराजे दराडे यांना त्यांच्या खबऱ्यांकडून मिळाली. ही खळबळ जनक खबर मिळताच ▶▶ उर्वरित पान २ वर

**● व्हेल माशाची उलटी काय असते?**

**व्हेल माशाच्या शरीरातून निघालेला ॲम्बरग्रीस (उलटी) हे अत्तर किंवा सुगंधित उत्पादनात वापरतात. जगभरात अत्तर हे लाखोच्या किमतीनें विकले जाते. त्यात ॲम्बरग्रीस (व्हेल माशाची उलटी) यापासून तयार केलेल्या अत्तर कोट्यवधींना विकत घेतले जाते. एवढेच नाही तर ॲम्बरग्रीसपासून अगरबत्ती आणि धूपही तयार केले जाते. अत्तरात उलटीचा वापर हा फिक्सेटीव्ह (स्थिरीकरण द्रव्य) म्हणून वापरतात. सेंट कपड्यावर किंवा शरीरावर मारल्यानंतर ते बराच काळ टिकावे यासाठी हे फिक्सेटीव्ह उपयुक्त असते. यासाठी काही केमिकल्स आहेत; परंतु त्याचा शरीरावर परिणाम होतो. उलटी नैसर्गिक असल्यामुळे त्याचा वाईट परिणाम होत नाही. त्यामुळे त्याला मागणी अधिक आहे. सेंटबरोबरच औषधातही वापर होतो.**

## जमीन घोटाळ्यात पार्थ तर टँगो दारूत जय पवारांचा भ्रष्टाचारात दस नंबरी बाप अजित'च ?

**● काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप**

**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांच्या अमेडीया होल्डिंग्ज एलएलपी या कंपनीने १८०० कोटी रुपयांच्या बाजारभावाची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांत विकत घेतल्याचा आरोप झाला आहे.आता काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांच्या दुसरा मुलगा जय पवारवर टँगो दारू कंपनीशी संबंधित भ्रष्टाचाराचा आरोप केला आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार



परिषदेत आरोप करताना म्हणाले की, अजित पवार स्वत:ची संपत्ती लपवण्यासाठी आणि तुरुंगवास टाळण्यासाठी भाजपात गेले आहेत. ▶▶ उर्वरित पान २ वर



# स्वातंत्र्याची जाणीव, संघर्ष आणि जबाबदारी : जागतिक स्वातंत्र्य दिनाचे समाजशास्त्रीय चिंतन

मानवजातीच्या इतिहासातील सर्वात मूलभूत आणि आधारभूत मूल्य जर कोणते असेल, तर ते म्हणजे स्वातंत्र्य होय. मनुष्य जन्मतः स्वतंत्र असतो, त्याला विचार करण्याचा, जगण्याचा, निर्णय घेण्याचा अधिकार जन्मापासूनच प्राप्त असतो. परंतु इतिहासाच्या विविध टप्प्यांत हे स्वातंत्र्य अनेकदा हिरावले गेले, त्याला बंधनांत अडकविण्यात आले, त्याच्या मनावर, शरीरावर आणि जीवनावर बाह्य शक्तींचे वर्चस्व प्रस्थापित करण्यात आले. कधी वसाहतवादाच्या रूपाने, कधी गुलामगिरीच्या रूपाने, कधी हुकूमशाहीच्या राजकीय व्यवस्थेद्वारे, तर कधी समाजातील विषमता, जात, धर्म, लिंग आणि वर्ग यांच्या नावावर व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यात आले. म्हणूनच ९ नोव्हेंबर रोजी साजरा होणारा 'जागतिक स्वातंत्र्य दिन' हा दिवस केवळ एका ऐतिहासिक आठवणीचा दिवस नसून स्वातंत्र्याच्या संघर्षाला, त्याच्या मूल्यांना आणि त्याच्या रक्षणाच्या सततच्या बांधिलकीला पुनर्स्मरण करण्याचा दिवस आहे.

स्वातंत्र्य ही केवळ राजकीय संकल्पना नाही, ती सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक, मानसशास्त्रीय आणि आर्थिक स्तरांवर पसरलेली एक बहुआयामी मूल्यव्यवस्था आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीला स्वतःच्या अस्तित्वाचे आणि ओळखीचे भान देणारी प्रक्रिया होय. मनुष्य समाजात जगतो, त्यामुळे त्याचे स्वातंत्र्य हे वैयक्तिक असले तरी त्याचे परिणाम सामूहिक असतात. स्वातंत्र्य म्हणजे बंधनांचा अभाव एवढाच मर्यादित अर्थ नसून, स्वातंत्र्य म्हणजे न्याय्य, सुरक्षित, समान आणि मानवी प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क होय. स्वातंत्र्य म्हणजे समाजातील सर्व व्यक्तींना संधींची समानता आणि योग्य साधनसंपत्ती उपलब्ध करून देणारी सामाजिक व्यवस्था होय. व्यक्तीच्या स्वातंत्र्याबरोबरच समाजाच्या विकासाच्या प्रक्रिया एकमेकांशी अभेद्यरीत्या जोडलेल्या आहेत.

मानवजातीने स्वातंत्र्यासाठी असंख्य संघर्ष केले आहेत. इतिहासातील प्राचीन साम्राज्यांनी लोकांना गुलाम केले, गोऱ्या वंशाने काळ्या वंशाच्या लोकांवर आपले वर्चस्व गाजविले, साम्राज्यशाही शक्तींनी आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या प्रदेशांना वसाहतवादाच्या जाळ्यात अडकविले, धर्माच्या किंवा शासनाच्या नावावर विचार आणि अभिव्यक्तीवर बंदी घालण्यात आली. या सर्व परिस्थितींना मनुष्याने आव्हान देत स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी चळवळी उभ्या केल्या. भारताची स्वातंत्र्य चळवळ ही जगातील सर्वात महत्त्वाच्या आणि अनुकरणीय संघर्षांपैकी एक ठरली. महात्मा गांधी, नेहरू, भगतसिंग, सुभाषचंद्र बोस, सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जवाहरलाल नेहरू, राजर्षी शाहू महाराज यांसारख्या असंख्य नेत्यांनी स्वातंत्र्याची व्याख्या फक्त परकीय शासनाच्या समाप्तीपर्यंत मर्यादित ठेवली नाही; त्यांनी स्वातंत्र्याला सामाजिक समानता, शैक्षणिक हक्क, आर्थिक न्याय, लिंग-समानता, जात-व्यवस्था निमूलन आणि मानवी प्रतिष्ठा यांसोबत जोडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली 'स्वातंत्र्य - समता - बंधुता' ही त्रिसूत्री मानवी स्वातंत्र्याच्या संकल्पनेचे सर्वोच्च तात्त्विक परिमाण आहे. त्याच्या आधारे भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, श्रद्धास्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क दिला आहे. परंतु समाजातील जातीय असमानता, पितृसत्ता, धार्मिक कट्टरता, संपत्तीचे असमान वाटप, ग्रामीण-शहरी दरी, गरीबी, निरक्षरता, बेरोजगारी, डिजिटल विभाजन, माध्यमांच्या एकाधिकारशाही आणि राजकीय ध्रुवीकरण यांसारख्या घटकांमुळे स्वातंत्र्य आजही अनेकांच्या आयुष्यात अपूर्ण, असमान आणि अधुरेच आहे.

आज 'स्वातंत्र्य' याची पुनर्व्याख्या करण्याची गरज आहे. आज व्यक्तीला राजकीयदृष्ट्या मतदानाचा हक्क आहे, अभिव्यक्तीची स्वायत्तता संविधानाने दिली आहे, परंतु डिजिटल युगात अभिव्यक्तीवर असलेल्या छुप्या नियंत्रणाचा, इंटरनेटवरील माहितीच्या गोंधळाचा, खोट्या प्रचाराचा, ट्रोल संस्कृतीचा, आणि विचारांवर होत असलेल्या मानसिक वर्चस्वाचा प्रश्न अधिक गंभीर स्वरूपात समोर आहे. हे बंधन अदृश्य आहे, भिंत दिसत नाही, परंतु मन आणि विचार कैद होतात.

आजही स्वतंत्र आणि लोकशाही राष्ट्रांमध्ये दिसणाऱ्या अनेक असमानता दर्शवितात की स्वातंत्र्य हा अंतिम ध्येय प्राप्तीचा टप्पा नसून तो सतत जपण्याचा आणि विस्तारित करण्याचा संघर्ष आहे. संविधानाने दिलेले अधिकार असले तरी समाजाची मानसिकता जर संकुचित, भेदभावपूर्ण आणि वर्चस्ववादी असेल तर हे स्वातंत्र्य केवळ कागदावरच राहते. उदा. व्यक्तीला विचारस्वातंत्र्य आहे, पण त्याच्या विचारावर हिंसेची प्रतिक्रिया झाली तर ते स्वातंत्र्य धोक्यात येते. महिलांना शिक्षण आणि कामाचा अधिकार आहे, परंतु पितृसत्ताक नियंत्रणामुळे त्यांच्या निर्णयस्वातंत्र्यावर बंधने येतात. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक समुदायांना कायदेशीर समानता आहे, पण सामाजिक स्तरावर अजूनही त्यांना भेदभाव, बहिष्कार आणि शोषणाचा सामना करावा लागतो. म्हणूनच स्वातंत्र्याचे खरे मूल्य व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात आणि समाजाच्या वर्तनात कसे प्रतिबिंबित होते, यावर अवलंबून आहे.

आजच्या जागतिक जगतात स्वातंत्र्याच्या संकल्पनेसमोर नव्या आव्हानांची मालिका उभी राहिली आहे. तंत्रज्ञानाने संवाद, शिक्षण, अर्थव्यवस्था आणि विचारांची देवाणघेवाण यांना गती दिली आहे, परंतु त्याचवेळी तेच तंत्रज्ञान निगराणी, डेटा-नियंत्रण, माहितीचे अपहरण, भ्रम-जागरूकता, आणि मानसिक गुलामगिरी निर्माण करण्याचे साधन बनत आहे. सोशल मीडिया ही माहिती स्वातंत्र्याची जागा असूनही तेथे द्वेष, फूटपाडणी, कट्टरमतवाद, मिथ्यप्रचार आणि वैयक्तिक विचारांचे नियंत्रण या गोष्टी वाढताना दिसतात. गोपनीयतेचा हक्क आणि सुरक्षिततेची गरज यांच्यातील संघर्ष दिवसेंदिवस गुंतागुंतीचा होत आहे. लोकशाही देशांमधील सत्ताकेंद्रे हळूहळू पुन्हा केंद्रीकृत होत असल्याचे दिसून येते, आणि नागरिकांना अज्ञानातून किंवा प्रचारातून नियंत्रित करण्याच्या पद्धती अधिक सूक्ष्म आणि धोकादायक बनत आहेत.

जागतिक स्तरावर आर्थिक असमानता ही स्वातंत्र्याला सर्वात मोठे घाव घालणारी प्रक्रिया आहे. जगातील केवळ काही टक्के लोकांकडे बहुसंख्य संपत्ती केंद्रित झाली आहे, तर मोठा लोकसमूह गरिबी, बेरोजगारी, भूक, कुपोषण आणि संघर्षांच्या सावटाखाली जगत आहे. आर्थिक हक्कांशिवाय स्वातंत्र्य अपूर्ण राहते. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे झाल्यास स्वातंत्र्याची खरी व्याप्ती म्हणजे सामाजिक-आर्थिक संधींची समानता होय. जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या कर्तृत्वानुसार प्रगती करता येत नसेल, त्याला शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सांस्कृतिक सहभागाच्या संधी मिळत नसतील, तर त्याचे स्वातंत्र्य तुटपुंजे आणि भावनिक स्वरूपाचे ठरते.

भारतातील स्वातंत्र्याची सामाजिक प्रकृती समजून घेण्यास सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकशाही होय. लोकशाही ही फक्त निवडणुकांमधील मतदानाची प्रक्रिया नसून, ती नागरिकांचा सहभाग, संवाद, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि विचार-विनिमय यांची सातत्यपूर्ण सामाजिक साधना आहे. जेव्हा नागरिक जागरूक असतात, तेव्हा स्वातंत्र्य सुरक्षित राहते. पण जेव्हा नागरिक अज्ञान, उदासीनता किंवा भीतीच्या छायेत अडकतात, तेव्हा स्वातंत्र्य कमजोर होऊ लागते. म्हणूनच स्वातंत्र्य टिकवण्यासाठी शिक्षण, विवेक, मानवतावाद आणि सामाजिक जागरूकता या मूल्यांचे संवर्धन अनिवार्य आहे.

स्वातंत्र्याचा सर्वात मूलभूत भाग म्हणजे मानवी प्रतिष्ठा होय. कोणत्याही व्यक्तीला त्याच्या वंशामुळे, धर्मामुळे, लिंगामुळे, भाषेमुळे किंवा सामाजिक-आर्थिक स्थितीमुळे कमी लेखले जाऊ नये. समाजात परस्पर आदर, सहिष्णुता, विविधतेची स्वीकृती आणि मानवी मूल्यांवरील विश्वास हे स्वातंत्र्याचे संरक्षण करणारे स्तंभ आहेत. स्वातंत्र्याला प्रेम, करुणा, संवेदनशीलता आणि न्यायाची जोड मिळाली तरच ते मानवी विकासाचे साधन बनते.

आजच्या या जागतिक स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आपल्यासमोर सर्वात महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे आपण स्वतंत्र आहोत, पण स्वातंत्र्यवादी आहोत का? म्हणजेच, आपण केवळ स्वातंत्र्य उपभोगतो की त्याची जबाबदारीही पार पाडतो? स्वातंत्र्य हे अधिकारांसोबत कर्तव्यांचीही मागणी करते. समाजातील अन्याय, भेदभाव, विषमता, हिंसा आणि दडपशाहीविरुद्ध आवाज उठविणे हीच स्वातंत्र्याची खरी परीक्षा आहे.

शेवटी असे म्हणता येईल की स्वातंत्र्य हे मिळवण्याची गोष्ट नसून जपण्याची प्रक्रिया आहे. ते सतत विचारले, तपासले, पुनर्निर्मित केले आणि सामूहिकपणे संरक्षित केले पाहिजे. स्वातंत्र्य म्हणजे फक्त आपले हक्क नव्हे; तर इतरांच्या हक्कांचा आदर करण्याची जाणिव होय. जागतिक स्वातंत्र्य दिन हा दिवस आपल्याला मानवी मूल्यांची आठवण करून देतो आणि आपल्याला सामाजिक न्याय, सहकार्य, समानता आणि मानवतावादी दृष्टिकोनाची दिशा दाखवतो. स्वतंत्र राष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाने हे स्मरण ठेवले पाहिजे की स्वातंत्र्याचे रक्षण हीच खरी नागरिकधर्माची साधना आहे, आणि ही साधना जिवंत ठेवणे हीच मानवतेची उज्ज्वल बांधिलकी आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

◆ पान १ वरून पुढे...

## बनावट सोने...

आरोपी विलास उदावंत याने यापूर्वीही स्वस्तात सोने देतो असा सापळा रचून अनेकांना गंडा घातल्याच्या तक्रारी होत्या. तरीदेखील त्याच्याकडून सोने तपासणीचे काम घेतल्याने बँकेच्या दक्षतेवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अभिषेक बेद्रे, अमोल गवळी, आनंद कुकडेजा, अनिल गिरी, अन्वर अख्तर अली, श्रीकृष्ण हवाले, महेश बेद्रे, प्रीत कुकडेजा, संभाजी चौरे, गुलाब शेख, महेबुब मलीक, पठाण रशीद, रिझवान शेख, किरण ठाकरे, सविता बेद्रे, तसेच सराफ विलास उदावंत, प्रविण शेडुते आणि किशोर भरडे. या प्रकरणी पोलिसांनी फसवणूक, विश्वासघात व कट रचल्याचे कलम लावून तपास सुरू केला आहे. प्राथमिक चौकशीत सराफ आणि खातेदार यांच्यात संगणमत असल्याचे स्पष्ट झाले.

## मोबाईल नोट...

तसेच वसुली विभागातील सम्राट कदम व विश्वांभर तिडके यांनी दामकरी काम इतकेच काम केले. चंद्रकांत काळे यांनी माझा पुरेपूर फायदा घेतला असा मजकूर आहे. यामुळे एकच खळबळ उडाली असून, ही नावे समोर आल्याने यांचा त्रास होता का? की, प्रमोशनाच्या लायक असताना ही डावलल्याने हा पाऊल उचलले की, काय? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे. या प्रकरणाचा पोलीस आता तपास करतील त्यातून हे नेमकं प्रकार काय हे निष्पन्न होईल. तसेच त्यांनी या नोट पॅडवर मित्रांची माफी मागितली असून, इतर वैयक्तिक व्यवहार बाबतीत उल्लेख आहे. तसेच सध्याचे सीओ फडसे यांना उद्देशून लिहिताना साहेब माझा कुटुंबाला परेशानी होऊ देऊ नका. वेळेवर त्यांना माझा पीएफ व इतर वेळेत द्यावे असे आवाहन करीत तुम्ही अभ्यासु आहात माझा तुमच्यावर विश्वास आहे असा मजकूर आहे. यामुळे याची पूर्ण चौकशी करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## '२५ कोटींची....

मी ४०-५० कोटींचे काम आणले. पण टक्केवारी देऊन पण तुमच्या आकाने ते काम अडवलं', असा आरोपी काळकुटे यांनी यावेळी केला. मला गरजवंत मराठा महत्वाचा वाटतो तुमची मैत्री नाही. संतोष देशमुख प्रकरण आणि महादेव मुंडे प्रकरणात आम्ही लक्ष दिलं तर तुमच्या लोकांनी धमक्या दिल्या. तुम्ही मित्र म्हणण्याच्या पुढे गेले आहात. मला मित्र म्हणून संभ्रम निर्माण करु नका. माझी आणि तुमची एकच भेट झाली. त्यावेळी काय काय पुढे पुढे केलं ते मला माहितीय. तुम्ही सभेनंतर बरेच फोन केले. माझ्याकडे अनेक रेकॉर्डिंग आहेत. मनोज दादा आणि माझ्या खुनाचा प्रयत्न केला. मला मारण्यासाठी तुमच्या लोकांनी गुंड पाठवले. मी बजरंग सोनवणे यांनाच मतदान केलं त्याचा व्हिडिओ दाखवला', असं रोखठोक प्रत्युत्तर गंगाधर काळकुटे यांनी दिलं आहे.

◆ पान १ वरून पुढे...

## इंदुरीकर महाराजांचं....

महाराज यांची मुलगी ज्ञानेश्वरी देशमुख आणि साहिल चिलाप यांचा नुकताच साखरपुडा पार पडला, या साखरपुड्यात प्रचंड खर्च करण्यात आल्यानं हा साखरपुडा चांगलाच चर्चेमध्ये आला आहे, यावरून आता इंदुरीकर महाराज यांच्यावर टीका होत आहे, मात्र जरी इंदुरीकर महाराज यांनी या साखरपुड्यात मोठा खर्च केला असला तरी देखील त्यांनी एक मोठा निर्णय देखील घेतला आहे. त्यांनी आपल्या मुलीच्या साखरपुड्यानिमित्त शेतकऱ्यांना १ लाख ११ हजार रुपयांची मदत केली आहे, त्यामुळे एकीकडे महाराजांवर टीका होत असतानाच आता दुसरीकडे त्यांचं कौतुक देखील होत आहे.

## झोपडीतून सुवर्णकुस्तीपटू ...

घेऊन भविष्य सांगतात, तर आई सुई-दाभण विकून उदरनिर्वाह करतात. अशा परिस्थितीतही सनीने हार न मानता कुस्तीच्या माध्यमातून जीवन बदलवण्याचा निर्धार केला आणि आज तो देशाचा मान उंचावणारा सुवर्णपदक विजेता ठरला आहे.सनीचा कुस्तीप्रवास आजोबांच्या काळापासून सुरू झाला. वडिलांनाही कुस्तीची आवड होती, मात्र आर्थिक अडचणींमुळे ती थांबवावी लागली. तरीही माझी मुलं पैलवान व्हावीत ही त्यांची इच्छा कायम राहिली. त्यांनी आपल्या तीन मुलांना भैय्या, बादल आणि सनी यांना स्वतः प्रशिक्षण दिलं. झोपडीजवळच्या माळरानावर तात्पुरती तालीम उभारून सुभाष फुलमाळी मुलांना सराव शिकवत असत. सनीचा खेळ पाहून रायबा तालीमचे वस्ताद पै. सोमनाथ मोझे आणि सदाशिव राखपसरे यांनी त्याला मार्गदर्शन सुरू केलं. पुढे लोणीकंद येथील जाणता राजा तालीममध्ये वस्ताद संदीप भोंडवे यांच्या प्रशिक्षणाखाली सनी अधिक परिपक्व झाला. वस्ताद भोंडवे यांनी त्याला दत्तक घेत सर्व खर्च उचलत सनीचं भविष्य घडवलं.सध्या सनी दहावीमध्ये शिक्षण घेत असून, महाराष्ट्र चॅम्पियनशिपमध्ये विजेतेपद आणि राष्ट्रीय स्पर्धेत रौप्यपदक जिंकल्यानंतर आता आशियाई युवा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत देशाचा गौरव वाढवला आहे. आष्टी मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांनी सनीचं अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या असून लवकरच त्याचा सत्कार आयोजित केला जाणार आहे.

## दिवसा होणार....

◆ पान १ वरून पुढे...

हे सूर्यग्रहण गेल्या १०० वर्षातील सर्वात मोठे सूर्यग्रहण असणार आहे. दिवसा अंधार होणार असल्याने या सूर्यग्रहणाचा कालावधी महत्वाचा आहे. विशेष म्हणजे हे ग्रहण तब्बल ६ मिनिटांच्या आसपास दिसले. सूर्यग्रहणाचा कालावधी ३ मिनिटे १० सेकंद असतो. मात्र, हे ग्रहण १०० वर्षातील सर्वात मोठे ग्रहण आहे आणि त्याचा कालावधी देखील दुप्पट म्हणजे ६ मिनिटांच्या पुढे असणार आहे. दिवसा तब्बल ६ मिनिटांपेक्षा जास्त म्हणजेच ६ मिनिटे २२ सेकंद पूर्ण अंधार होईल. हे पूर्ण सूर्यग्रहण भारताच्या राजस्थान, गुजरात, गोवा आणि महाराष्ट्रातून दिसेल. २ ऑगस्ट २०२७ रोजी दुपारी भारतीय वेळेनुसार, ४ ते ६ च्या दरम्यान दिसेल. सूर्यग्रहण ही एक खगोलीय घटना आहे. चंद्र, सूर्य आणि पृथ्वी यांच्या संयोगात घडते. जेव्हा चंद्र सूर्य आणि पृथ्वीच्या मध्ये येतो आणि सूर्य पूर्णपणे अस्पष्ट होतो तेव्हा पूर्ण सूर्यग्रहण होते. यादरम्यान काही मिनिटे पूर्णपणे अंधार होतो. हा एक अत्यंत खास क्षण नक्कीच असतो. हे सूर्यग्रहण येमेन, ट्युनिशिया, लिबिया, सौदी अरेबिया, सुदान, इजिप्त, अल्जेरिया, सोमालिया या देशात दिसेल.

## आंतरराष्ट्रीय बाजारात...

पोलीस अधीक्षकांशी त्यांनी संपर्क साधून माहिती सांगितली. पोलीस अधीक्षकांनी याप्रकरणी कारवाई करण्याचे आदेश शिवाजीनगर पोलिसांना दिले. बाळराजे दराडे यांनी खबऱ्या मार्फत लक्ष ठेवले. त्यानुसार च-हाटा फाट्यावरून तस्कर कार मधून बीड शहरात येत असल्याची माहिती समोर आली. त्यानुसार एका हॉटेलजवळ शैलेश प्रभाकर शिंदे वय- ३८ वर्ष,रा .हवेली, पुणे व विकास भीमराव मुळे वय-३० वर्ष रा. शिखरवाडी, ता. पाटोदा या दोन संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी या दोघांकडून सव्वा किलोच्या घरात उलटी जप्त केली आहे. ज्याची किंमत १ कोटी २१ लाख ५० हजार असल्याचे सांगितले जात आहे. सध्या या उलटीची तपासणी करण्यात येत असून पोलिसांना ही उलटी व्हेलं माशाचीच असल्याचा संशय आहे. दरम्यान बीड जिल्ह्यात पहिल्यांदाच शिवाजीनगर पोलिसांना व्हेलं सारख्या तस्करीत मोठी कारवाई करण्याची संधी मिळाली आहे. पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोलीस उपनिरीक्षक एम. एस. सोन्ने, रवी आघाव आदींनी केली आहे.

शरीरातील अपचन झालेले पदार्थ बाहेर टाकले जातात. वैज्ञानिक भाषेत याला ॲम्बरग्रीस असे म्हटले जाते. स्पर्म व्हेलच्या शरीरातून निघणारा हा पदार्थ काळ्या रंगाचा असून हा ज्वलनशील पदार्थ मानला जातो. व्हेलचे आवडतं खाद्य म्हणजे, म्हाकुळ होय. म्हाकुळचा तोंडाचा भाग पोपटाच्या चोचीसारखा असतो. तो पचन नाही. तसेच व्हेल कोळंबी खातो. ज्याचा भाग कडक असल्यामुळे तो पचत नाही. न पचलेला भाग व्हेल उलटून टाकतो. त्यात विविध प्रकारची रसायनेही असतात. उलटी लाटांवर तरगंत राहिल्यामुळे आपसूक त्यावर प्रक्रिया होते आणि ती मेणासारखी बनते. समुद्राच्या लाटाबरोबर ती तरंगत किनार्याला लागत असल्याचं अभ्यासक सांगतात. एम्बरग्रीसच्या व्यापारावरील कायदेशीर निर्बंध- भारतात आणि इतर अनेक देशांमध्ये व्हेल माशाच्या उलटीच्या व्यापारावर बंदी आहे, कारण स्पर्म व्हेल एक संरक्षित प्रजाती आहे. त्यामुळेच एम्बरग्रीसची तस्करी केली जाते आणि अनेकदा पोलिस किंवा इतर कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून त्याची जप्ती होते.

## जमीन घोटाळ्यात...

पण पक्ष बदलल्यानंतरही त्यांचे कारनामे सुरूच आहेत. दोन्ही मुलांना ते नंबर दोनचे धंदे करायला लावतात आणि स्वतः दस नंबरी बनून उपमुख्यमंत्री पदाची खुर्ची घट्ट पकडून बसले आहेत. सपकाळ म्हणाले की, अजित पवार यांच्या एका मुलाचे नाव भ्रष्टाचारात आलंय, तर दुसऱ्याचा दारू व्यवसायात. त्यांच्या एका मुलाची कंपनी पुण्यातील सरकारी जमिनीच्या व्यवहारात अडकली आहे, तर दुसऱ्याची टँगो नावाची दारू कंपनी आहे, ज्याला अजित पवार यांनी अबकारी मंत्री म्हणून निर्णय घेत संरक्षण दिलं, असा आरोप त्यांनी केला. सपकाळ म्हणाले की, टँगो कंपनीला थेट फायदा मिळावा म्हणून अजित पवारांनी अबकारी खातं आपल्या ताब्यात ठेवलं आहे. या खात्याशी संबंधित महत्त्वाचे निर्णय ते स्वतः घेतात, ज्यामुळे टँगोला आर्थिक लाभ मिळतो. त्यामुळे राज्यात डबल गेम, डबल भ्रष्टाचार सुरू आहे. एकीकडे जमिनीचे व्यवहार, तर दुसरीकडे दारू कंपनीला मिळालेलं संरक्षण, हा डबल धमाकाच आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली. त्यांनी अजित पवार यांना भस्म्या आजार झाला असल्याचं सांगत म्हटलं की, हा असा आजार आहे की कितीही खाल्लं तरी अजून खावंसं वाटतं. आधीच एवढं खाल्लंय, तरी अजून किती खाणार? दरम्यान, पार्थ पवार यांच्या कंपनीच्या जमीन खरेदी प्रकरणानंतर विरोधकांनी अजित पवारांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी सोशल मीडियावर लिहिलं की, मुलगा पुण्यात ३०० कोटी रुपयांचा व्यवहार करतो आणि वडिलांना काहीच माहिती नसते, हे कसं शक्य आहे? बाजारभावापेक्षा कमी दरात जमीन विकत घेतली गेली आहे, त्यामुळे या प्रकरणात चौकशी आवश्यक आहे. त्यांनी पुढे म्हटलं की, खडसेंच्या काळात असाच आरोप झाला होता, आणि त्यांना राजीनामा द्यावा लागला होता. मग अजित पवारांनीही नैतिकतेचा आधार घेत राजीनामा द्यावा. कोरेगाव पार्क प्रकरणात न्यायमूर्ती झोटिंग समितीप्रमाणे चौकशी समिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेमावी, अशी मागणी त्यांनी केली.

◆ पान ४ वरून पुढे...

## अंशतः अनुदानित...

शिक्षकांनी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे काम तातडीने करून दिल्याबद्दल आज शुक्रवार दिनांक ७ रोजी बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीच्या वतीने वतीने शिक्षणाधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील मॅडम, उपशिक्षणाधिकारी श्री तुरुकमारे यांच्यासह पे युनिटचे अधीक्षक श्री राजेश खटावकर, वरिष्ठ मुख्य लिपिक श्री चाटे आणि वरिष्ठ लिपिक श्री खडकीकर यांचा सत्कार विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा अध्यक्ष श्री. वैजनाथ चाटे सर, छत्रपती संभाजीनगर कार्याध्यक्ष श्री जितेंद्र डोंगरे सर, बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर, श्री बाळासाहेब नागरगोजे सर, श्री. सुरेश कदम सर, श्री. खाडे सर, श्री. नामदेव मुंडे सर, श्री. शेख सर, श्री. गंगार्डे सर, श्री. लहाने सर यांनी केला. या सत्कार प्रसंगी बोलताना शिक्षणाधिकारी श्रीमती प्रिया राणी मॅडम म्हणाल्या की, मी बीड जिल्ह्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सदैव प्रयत्नशील आहे. विशेष म्हणजे विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शिक्षकांच्या प्रश्नांबद्दल मला जाण आहे. त्यांचा खडतर संघर्ष आहे याची मला कल्पना आहे. त्यामुळे या शिक्षकांच्या आणि त्यांच्या कुटुंबाप्रती मला सातत्याने सहानुभूती निर्माण होते. त्यामुळे त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी पुढाकार घेऊन सदैव प्राधान्य देत असते, यापुढेही प्राधान्याने अंशतः अनुदानित आणि विना अनुदानित शाळेतील शिक्षकांचे प्रश्न मार्ग लावण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. यावेळी विनाअनुदानित शाळा कृती समितीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नामदेव मुंडे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री सुरेश कदम मामा यांनी मानले.

## वैभव सोनवणे...

न्याय इथून पुढे देखील मिळवून द्याल व सर्व लोकांच्या अडीअडचणी आपण जाणून घेऊन शासन प्रशासन दरबारी चांगल्या प्रकारे सोडवाल अशी अपेक्षा मा बळीराम गवते यांनी व्यक्त केली व पुढील कार्यास बळीराम गवते यांनी शुभेच्छा दिल्या तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष मा राजेश्वर चव्हाण साहेब यांनी देखील वैभव सोनवणे यांचे अभिनंदन करून पुढील उत्कृष्ट कार्यास शुभेच्छा दिल्या.

## कार्यालयीन वेळ...

कार्यालय सोडतात. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते. शासनाने या प्रकारांकडे गांभीर्याने पाहून जबाबदार अधिकाऱ्यांवर निलंबना सारखी कठोर पावले उचलावीत. या घटनेमुळे पंचायत समिती पाटोदा कार्यालयातील शिस्त, जबाबदारी आणि प्रशासनातील उत्तरदायित्वाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांकडूनही या प्रकाराची दखल घेऊन योग्य ती तपासणी करण्याची मागणी होत आहे. शिरोळे मते, शासकीय अधिकारी हे जनतेचे प्रतिनिधी नसले तरी त्यांची जबाबदारी जनसेवा बजावण्याची असते. त्यामुळे कार्यालयीन वेळेत अनुपस्थित राहणाऱ्या अधिकाऱ्यांना शासनाने उदाहरणार्थ शिक्षा देणे गरजेचे आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये.पाटोदा तालुक्यातील प्रशासनात आता या घटनेमुळे खळबळ माजली असून, सामाजिक कार्यकर्ते राहुल शिरोळे यांच्या मागणीला व्यापक चांगला पाठिंबा मिळत आहे. जनतेच्या हितासाठी आणि कार्यालयीन शिस्तीच्या पुनर्स्थापनेसाठी प्रशासनाने लवकरात लवकर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते राहुल शिरोळे यांनी केली आहे.

## माजी आ.भीमराव...

विविध शैक्षणिक संस्था,आरोग्य क्षेत्रातील विविध महाविद्यालय युवकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन,भव्य व्यायाम शाळा, कृषी महाविद्यालय सुरु केले आहे. शेतकऱ्यांसाठी साखर कारखान्यासाठी सध्या संघर्ष उभा केला आहे.एक अभ्यासू, शांत,शिस्तप्रिय आणि विकासाची गंगा मतदार संघात आणण्यासाठी एक निश्चित ध्येय ठेवून चालणारा राजकारणी अशी भीमराव धोंडे यांची ओळख महाराष्ट्राच्या राजकारणात आहे.आष्टी विधानसभा निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर सुद्धा त्यांची लोकप्रियता कायम राहिली. आष्टी,पाटोदा, शिरूर का. विधानसभा मतदार संघातील कार्यकर्त्यांच्या चर्चेतून आणि आग्रहावरून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये प्रवेश करावा अशी इच्छा सर्वांकडुन व्यक्ती केली जात होती.या सर्वांचा आदर करत माजी आ.भीमराव धोंडे यांनी येत्या ११ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई येथील राष्ट्रवादी भावनांमध्ये प्रमुख ५०० कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये आणि मान्यवर नेत्यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा संपन्न होणार असल्याची माहिती माजी आ.भीमराव धोंडे यांच्या संपर्क कार्यालयातुन मिळली आहे. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार हे सत्ता पक्षातील अत्यंत आक्रमक धडाडीचे नेते म्हणून ओळखले जातात.त्यांच्या पक्षातून त्यांच्या माध्यमातून विकास करण्यासाठी शक्ती आणि बळ मिळेल आणि सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर आणि सर्व घटकांना अपेक्षित न्याय मिळेल अशी अपेक्षाही या निमित्ताने माजी आ. धोंडे यांनी व्यक्त केले आहे.यानंतर मात्र मतदार संघातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलणार असून भीमराव धोंडे यांना मोठे यश प्राप्त होईल असा राजकीय अंदाज आहे.माजी आ. भीमराव धोंडे हे भाजपमधून निलंबन केल्यानंतर सुद्धा त्यांनी भाजपात पुनर्प्रवेशासाठी प्रयत्न केला परंतु विधानसभा अपक्ष लढवल्याने भाजपचे आ.सुरेश धस यांनी लेखी पत्र देऊन भाजपामध्ये प्रवेश देऊ नये असे म्हटले.

## इतिहास विभागाची....

शिवाजी महाराज व श्रेष्ठ विचारवंत घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पावन स्मृतींचा इतिहास या सहलीच्या निमित्ताने अभ्यासला.या सहलीत एकूण अठरा विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सहलीतून इतिहासाबद्दलची ओढ, अभ्यासाची गोडी आणि संघभावना आत्मसात केली. सहलीचे आयोजन इतिहास विभागप्रमुख तथा उपप्राचार्य डॉ. अनीता व्यंकटराव शिंदे आणि प्रा. संजय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांनी ही सहल स्मरणात राहील अशी ठरल्याचे सांगितले.

## जन्मभर ज्ञान...

बुद्ध वंदना घेण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते ५ जेष्ठ महिलांचा माता रमाई, राष्ट्रमाता जिजाऊ मा साहेब यांच्या जीवन चरित्राची पुस्तके व पुष्पगुच्छ देऊन वाचाल तर वाचाल तर्फे सत्कार करण्यात आला; ज्या मातांनी लौकिक अर्थाने शिक्षण घेतलेले नाही परंतु डॉक्टर बाबासाहेबांच्या शिक्षण घेण्याच्या आवाहनानुसार अनेक हालापेष्टा सहन केल्या व आपल्या पाल्यांना, नातवांना शिक्षणाची कास धरावयास लावली. वाचाल तर वाचाल वाचनालयातर्फे १६ वे केंद्र असलेल्या या विहारात ६ फेरीतील ५० पुस्तकाचा संच विद्यार्थ्यांना वितरित करण्याकरता आयु. बबन जोगदंड यांना मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. या प्रसंगी या संचातील पुस्तकांचा विद्यार्थी व पालकांनी पुरेपूर उपयोग घ्यावा असे नम्र आवाहन विद्यार्थी व पालकांना वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी केले. शाळा प्रवेश दिनाचे व विद्यार्थी दिनाचे औचित्य साधून गरजू व होतकरू विद्यार्थीनी रिंकू जोगदंड वर्ग १० वी या विद्यार्थीनीला फुले, शाहू, आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, माता रमाई, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाची व स्पर्धा परीक्षा करता उपयोगी १६ पुस्तके पेन कंपास (शालेय साहित्य) देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व पुढील शिक्षणाकरता शुभेच्छा देण्यात आल्या. दरवर्षी २०१८ सालापासून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिनी एका गरजू व होतकरू विद्यार्थ्यास अशाच प्रकारचे सहाय्य करून उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याकरता वाचाल तर वाचाल वाचनालय मदत करीत असते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural ) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# रोड रॉबरी प्रकरणात सोनू जाधव व जयपाल भालेराव यांना जामीन मंजूर : ॲड. योगेश टेकाडे

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील चर्चेतील रोड रॉबरी प्रकरणात अटक करण्यात आलेले आरोपी सोनू जाधव व जयपाल भालेराव यांना जिल्हा व सत्र न्यायालय, बीड यांनी जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात आरोपींच्या वतीने प्रभावीपणे युक्तिवाद ॲड. योगेश टेकाडे पाटील (जिल्हा व सत्र न्यायालय, बीड) यांनी केला असून त्यांना ॲड. वैभव होळकर यांनी सहकार्य केले.



